# The Baptist Tabernacle of Los Angeles

Mailing Address:
P. O. Box 15308
Los Angeles, CA 90015
Phone: (213) 744-9999
E-mail: rlhymersjr@sbcglobal.net
www.sermonsfortheworld.com
www.baptisttabernacle.com




Dr. Christopher L. Cagan
Pastor

Dr. R. L. Hymers, Jr.
Pastor Emeritus

डिसेंबर, 2020

प्रिय मित्र:

संपूर्ण 2020 मध्ये आपण कसल्या सैतानी गोंधळाच्या परिस्थितीत जगलो ! राष्ट्राध्यक्षावर महाभियोग चालविण्यात आला! कोरोना विषाणू येऊन धडकला! जंगलाला लागलेल्या आगीने जंगलाचा पुष्कळसा भाग जळून गेला! कांही लोक कम्युनिस्ट बनून नगरे जाळीत, जंगलात गेले! मी स्वतः उभे राहून प्रचार करु शकत नाही! “पुढील काळात विश्वासापासून कित्येक लोक भ्रष्ट होतील; ज्या माणसांची सद्सद्विवेकबुद्धी तर डाग दिल्यासारखीच आहे, अशा खोटे बोलणा-या माणसांच्या ढोंगाने ते फुसलावणा-या आत्म्याच्या व भुतांच्या शिक्षणाच्या नादी लागतील ” (I तिमथी 4:1, 2)! पोपने सुद्धा सम-लैंगिकांच्या संघटनेस सम्मति दिली! असं वाटतं संपूर्ण जगाचा स्फोट होतो की काय; येशू म्हणाला,

> “तेव्हां सूर्य, चंद्र व तारे ह्यांत चिन्हें घडून येतील, आणि पृथ्वीवर ‘समुद्र व लाटा ह्यांच्या गर्जनेनें राष्ट्रें’ घाबरी होऊन पेचांत पडतील ; भयाने जगावर कोसळणा-या अरिष्टांची धास्ती घेतल्यामुळे माणसें मरणोन्मुख होतील. ‘आकाशातील बळें डळमळतील.’ त्या काळी ‘मुष्याचा पुत्र’ पराक्रमाने व मोठ्या वैभवाने ‘मेघात येताना’ लाकांच्या दृष्टीस पडेल. ह्या गोष्टीस आरंभ होऊ लागेल तेव्हा सरळ उभे राहा आपली डोकी वर करा ; कारण तुमचा मुक्तिसमय जवळ आला आहे” (लुक 21:25-28).

> “आईबाप, भाऊबंद, नातलग व मित्र हे देखील तुम्हांला धरुन देतील ; आणि तुमच्यातील कित्येकांना जिवे मारतील” (लुक 21:16).

आपण हा उतारा कसा वाचतो आणि का पाहत नाही की सध्या आपण पवित्रशास्त्रातील भविष्यवाणीमध्ये सांगितलेल्या शेवटल्या काळात जगत आहोत का?

“पण हा नाताळाचा काळ आहे, तुम्ही म्हणाल! डिसेंबर 1941 मध्ये चर्चिल येथे इंग्लंडहून आला कारण जपानच्या लोकांनी पर्ल हार्बरवर आणि हिटलरने लंडनवर बॉंब हल्ला केला. चर्चिल हे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रोझवेल्ट बरोबर व्हाईट हाऊसमध्ये होते. जेव्हां राष्ट्राध्यक्षानी नाताळझाड उजळून काढले, चर्चिल म्हणाले,“लेकरांना खेळांच्या ह्या रात्रीची मजा व आनंद लुटू द्या.”

परंतू आता तुम्ही व मी “लेकरं” राहिलो नाही! ही समजून घेण्याची वेळ आहे की सध्या आपली आशा केवळ बेथलेहेममध्ये, जन्मलेल्या बाळावर टिकून आहे - आणि ही आपली आशा खरी नाही पण येशू जो राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू म्हणून दुस-यांदा येणार ती आहे!

***तुम्ही आमचे शब्दा-करिता-शब्द उपदेश व पाठ पंचे-चाळीस भाषांमधून WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर वाचू शकता.***

फार पूर्वी, 1950 मध्ये, देवाने मला एक शास्त्रवचन दिले जे मला विश्वास त्यागाच्या काळात मला खूप उपयोगी पडले.

"मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व कांही करावयास शक्तिमान आहे" (फिलिप्पै 4:13).

आम्ही 2 फेब्रुवारीला सकाळ व सध्याकाळच्या उपासनेत चीनी नववर्ष साजरे केले.

मार्च 1 ला होप स्ट्रीटवरील इमारतीमध्ये आमचा शेवटचा रविवार होता. कोरोना विषाणूमुळे, आम्ही बाकीचे सगळे वर्ष (2020) आम्ही दोन घरांमध्ये भेटलो. दर आठवडी मी एका पाठाचे व्हिडीओ रेकॉर्डींग केले, ज्याचे प्रसारण दोन्ही घरांमध्ये केले. व्हिडीओच्या माध्यमातून शिकविल्यानंतर आम्ही सर्वजण रात्रभोज करीत असे.

12 एप्रिलला, पुनरुत्थानाच्या दिवशी माझा 79वा वाढदिवस आला. आम्ही 16 एप्रिलला मिसेस. हायमर्स यांचा देखील वाढदिवस साजरा केला. त्यांच्याविषयी मी म्हणू शकतो. "बहुत स्त्रियांनी सद्गुण दाखविले आहेत पण तू त्या सर्वांहून वरचढ आहेस" (नीतिसुत्रे 31:29).

आमच्या मंडळीने 27 सप्टेंबरला आमच्या लग्नाचा 38वा वाढदिवस साजरा केला. गेले वर्ष मी खालच्या आतड्याच्या आजाराने त्रस्त होतो, त्यामुळे मला उभे राहून उपदेश देणे अशक्य झाले. ज्या मज्जातंतू मुळे हा आजार उद्भवला त्याचा समुळ नाश करण्यासाठी तीव्र विकिरणाचा मारा करावा लागला, जो क्रोहन्सच्या आजारासारखा आहे.

तरीही, ह्याच वर्षी, देवाने आमचे कार्य आशिर्वादित केले! www.sermonsfortheworld.com या संकेतस्थळा वरील आमचे वचना-मागून-वचन हा पवित्रशास्त्राभ्यास व उपदेश आणखी तीन भाषांमधून वाढले. आम्ही खोंगसो चीन ह्या, म्यानमार (बर्मा) च्या स्थानिक भाषेची 43वी भाषा म्हणून भर घातली. भारतातील आणखी एक भाषा, मळ्यालमसुद्धा आमची 44वी भाषा म्हणून भर घातली. त्यानंतर सिंहली ह्या, श्रीलंकेच्या भाषेचा 45वी भाषा म्हणून भर घातली.

दर आठवडी संपूर्ण जगभरामधून मला विविध प्रचारकाकडून चांगले इमेल येतात त्यात ते त्यांना ह्यां पाठांचा व उपदेशांचा कसा उपयोग होतो हे सांगतात.

7 जुलैला कांही अटींवर होप स्ट्रीटवरील आम्ही जुनी इमारत उघडली, रॉबर्ट आमचा मुलगा याने त्यासाठी केलेल्या कामाबद्दल त्याचे विशेष आभार.

13 आक्टोबरला आम्ही संपूर्ण मंडळीने रिव्हरसाईड नॅशनल सिमेंटरी येथे घेतलेल्या उपासनेत युगेन ग्रेस यांच्या जीवनाबद्दल आनंद साजरा केला. डॉ. कागेन यांनी मि. ग्रेस यांच्या वयाच्या 91 वर्षी मृत्यूच्या काही तास अगोदर त्यांना येशूच्या विश्वासात आणले. मि. ग्रेस हे आमच्या मंडळीतील तरुण सदस्य, टॉम सिया याचे सावत्र वडील होते. काही आठवड्या नंतर, डॉ. कागेन यांनी मि. ग्रेस यांची पत्नी, सोफीला शुभवर्तमान सांगितले, आणि ती आता सार्वकालीक जीवनात आहे. सॅन गॅब्रीएल या नवीन ठिकाणी आम्ही बाप्तिस्मा केलेली ती प्रथम व्यक्ति असावी. मिसेस. हायमर्स ह्या मला मि. ग्रेस यांच्या रिव्हरसाईड येथील अंतविधीच्या उपासनेला हजर राहण्यास घेऊन गेल्या. तेथून त्या मला ऑक्सनॉर्ड येथे घेऊन गेल्या, जेथे आम्ही काही दिवस समुद्र किनारी आरामात घालविले.

22 नोव्हेंबरला (रविवारी) अल्हांबरा येथील डॉ. कागेन यांच्या घरी उपकारस्तुति मेजवानीचे आयोजन करण्यात आले आहे.

मी अजूनही कार्यरत आहे, पाठ व उपदेश लिहीत, व डॉ. कागेन यांना साहाय्य करीत आहे. काही आठवड्यातच, मी माझ्या आयुष्याच्या 81व्या वर्षी पदार्पण करीत आहे. माझी मोलवान पत्नी इलीना - आणि ज्या येशूकडून मला पुढे जाण्यास सामर्थ्य प्राप्त झाले ह्यांच्याशिवाय मी हे काम करु शकलो नसतो.

"मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व कांही करावयास शक्तिमान आहे" (फिलिप्पै 4:13).

***तुम्ही आमचे शब्दा-करिता-शब्द उपदेश व पाठ पंचे-चाळीस भाषांमधून***
***WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर वाचू शकता.***

हे येशूचे अभिवचन आहे! माझे सहकारी डॉ. ख्रिस्टोफर एल. कागेन यांची, साक्ष सांगून मी समाप्ति करीत आहे:

> काही वर्षापूर्वी मला शांति मिळत नव्हती. मी स्वतःकरिता जगत होतो. मी देवासंबंधाने व मरणानंतर काय होणार याविषयी कध विचार केला नव्हता. माझा स्वतःवर विश्वास विश्वास होता. मी देवापासून लपून दूर पळत असे. मला महाविद्यालयात अ दर्जा मिळाला आणि पुष्कळ पैसे कमाविले, पण तरीही मी एकाकी व दुःखी होतो.
>
> त्यानंतर मी काही ख्रिस्ती लोकांना भेटलो जे माझ्यासाठी चांगले होते. मी मंडळीत जाऊ लागलो. पण तरीही मला माझ्या पद्धतीने जगावेसे वाटे. एका रात्री मी एका संभेला शाळेत गेलो. एका तरुणाने मी कधीही ऐकली नाही अशी गोष्ट ऐकवली - ती म्हणजे परमेश्वर माझ्यावर प्रीति करतो व तो मला सार्वकालीक जीवन देऊ इच्छितो. ते जीवन कसे मिळवायचे हे त्याने मला सांगितले. त्या रात्री मी येशूवर विश्वास ठेवला. त्याने माझ्या पापांची क्षमा केली व मला सार्वकालीक जीवन दिले.
>
> आता मला शांति आहे. आता मला सार्वकालीक जीवन मिळाले आहे. येशूने मला आतून बरे केले आहे. त्याने मला आशा व आनंद दिला आहे. आता मी एकाकी राहिलो नाही. माझा ठाऊक आहे की मी आज मेलो तर, मी देवाबरोबर स्वर्गात सैदव असेन, कारण येशूने मला सार्वकालीक जीवन दिले आहे!

येशूबरोबर काम करणे आनंददायी आहे! त्याचे सामर्थ्य व कृपा याच्याशिवाय तसेच, डॉ. कागेन, इलेना. आणि आमचा मुलगा जॉन वेस्ली, जो फ्लेबोटॉमी व तत्सम विषय शिकण्यासाठी पुढील वसंत ऋतूमध्ये महाविद्यालयात जाणार आहे, ह्या सर्वांच्या शिवाय मी हे करु शकलो नसतो.

येशू तुम्हांस व तुमच्या कुटुंबास आशिर्वाद देवो! येशूच्या द्वारे सुटका ह्या कैंटच्या पुस्तकाचे संकलन करतांना, माझ्यासाठी व कैंट फिलपॉटसाठी प्रार्थना करा! आम्ही सॅन गॅब्रीएल येथे नवीन चीनी बॅप्टिस्ट मंडळी सुरु करीत आहोत त्यासाठीही प्रार्थना करा.



डॉ. हायमर्स पत्नी इलेना, त्यांचा मुलगा रॉबर्ट, रॉबर्टची पत्नी जिन, रॉबर्टच्या दोन मुली, हन्ना व सारा. मी अशी प्रार्थना करीत आहे की त्यांना आणखी एक बाळ व्हावे.

युगानयुग ख्रिस्ताची स्तुति असो!



रेव्ह. आर. एल. हायमर्स, ज्युनि.,
D.Min., D.Rel., Th.D., Litt.D.
फिलिप्पै 4:13

"ज्ञानपथापासून जो बहकतो त्याला मेलेल्यांच्या मंडळीत विश्रांती मिळेल" (नीतिसुत्रे 21:16).

***तुम्ही आमचे शब्दा-करिता-शब्द उपदेश व पाठ पंचे-चाळीस भाषांमधून***
***WWW.SERMONSFORTHEWORLD.COM या संकेतस्थळावर वाचू शकता.***